प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा
आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

बेस्ट

PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI
ELECTRIC SUPPLY &
TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर,

संपादक / वृत्तसंपादक

प्रसिध्दी पत्रक क्र.०७
दिनांक : ०२.०९.२०२४

( सुदास सावंत )
जनता संपर्क अधिकारी

---

## सार्वजनिक गणेशोत्सव २०२४ - गणेश भक्तांकरिता विविध उपक्रम

मुंबई, ०२ - दरवर्षी बेस्टच्या विद्युत पुरवठा विभागाकडून सार्वजनिक गणेशोत्सवासाठी मिरवणूक मार्ग, विसर्जन स्थळे या ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिलेल्या कार्यादेशानुसार प्रकाश योजना केली जाते आणि गणेशोत्सव मंडळाना त्यांच्या वीज पुरवठा मागणी अर्जानुसार तात्पुरता वीज पुरवठा केला जातो. तसेच गणेश भक्तांसाठीची बस वाहतुक व्यवस्था बेस्टच्या वाहतुक विभागाकडून केली जाते. वर्ष २०२४ साठी बेस्ट उपक्रमाने केलेल्या व्यवस्था याची माहिती खालील प्रमाणे आहे.

बेस्टच्या मार्गप्रकाश विभागाने बृहन्मुंबईमहानगरपालिकेच्या कार्यादेशानुसार मिरवणूक मार्गावरील व विसर्जनस्थळांवरील प्रकाश योजनेची सुरक्षततेच्या दृष्टीने आखणी केलेली आहे. बेस्ट उपक्रमातर्फे मुंबई शहरात गणेशभक्तांसाठी ७१ मिरवणूक मार्ग, २० विसर्जन स्थळे आणि ३९ कृत्रिम तलाव येथे **२५९१ दिवे** लावण्याची प्रकाश योजना करण्यात येणार आहे. विसर्जन स्थळांवर सुयोग्य प्रकाश व्यवस्थेकरीता एकूण **१५ स्थायी विद्युत मनो-यांची** उभारणी केली आहे. तसेच मोठया गर्दीच्या ठिकाणी आपत्कालीन परिस्थितीत विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी विसर्जन स्थळांवर पर्यायी वीज पुरवठयाकरीता एकूण **८ डिझेल जनित्र संचाची** व्यवस्था करण्यात येणार आहे.

Scanned with OKEN Scanner

समुद्रात विसर्जन करताना आपत्कालीन प्रसंग उद्‌भवल्यास बुडणा-यांना वाचविण्यासाठी जीवरक्षक दलास मदत म्हणून समुद्रात खोलवर प्रकाश पोहोचण्यासाठी एकूण **१९ उच्च क्षमतेचे झोत असलेले शोधप्रकाश (सर्चलाईट)** दिव्यांची व्यवस्था करण्यात येणार आहे. विसर्जन स्थळांवरील वीज पुरवठा सुरळीत व अखंडपणे चालू ठेवण्यासाठी अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात येईल.

मुंबई शहर हद्‌दीत साजरा करण्यात येणा-या सार्वजनिक गणेशोत्सवाच्या अनुषंगाने दरवर्षी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे तसेच मुंबईकरांच्या माहितीसाठी बेस्ट उपक्रमाच्या मार्गप्रकाश विभागातर्फे एक माहितीपुस्तिका दिनांक २८ ऑगस्ट, २०२४ रोजी प्रकाशित करण्यात आली.

विद्युत रोषणाईसाठी गणेशोत्सव मंडळांना तात्पुरता वीजपुरवठा मिळण्यासाठी अर्जदारांनी पूर्ण करावयाच्या नियम व अटींच्या सर्व सुचना तसेच बेस्टच्या मार्गप्रकाश विभागाने मिरवणूक मार्गावरील व विसर्जनस्थळांवरील प्रकाश योजनेची माहिती आणि गणेश भक्तांसाठीची बस वाहतूक व्यवस्था यासंदर्भात संपूर्ण माहिती माहितीपुस्तिकेच्याव्दारे प्रदर्शित केलेली आहे. सदर पुस्तिका बेस्ट उपक्रमाच्या वेबसाईटवर (www.bestundertaking.com) देखील उपलब्ध केलेली आहे.

═══

Scanned with OKEN Scanner